आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

११ जानेवारी २०२५ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या राष्ट्रीय युवा दिनानिमित्त दिल्लीत भारत मंडपम् इथं तीन हजार युवा नेत्यांशी संवाद साधणार

- गेल्या वर्षभरात १६ हजार ९१४ कोटी रुपयांचे अमली पदार्थ जप्त करण्यात यश आलं असून, स्वातंत्र्यानंतरची ही सर्वात मोठी कामगिरी, असल्याचं केंद्रीय गृहमंत्र्यांचं प्रतिपादन

- राष्ट्रकुल देशांमधल्या संसदांचे सभापती आणि पीठासीन अधिकाऱ्यांची २८ वी परिषद पुढच्या वर्षी भारतात होणार

**आणि**

- येत्या प्रजासत्ताक दिनाच्या संचलनासाठी महाराष्ट्रातल्या एकूण २३ जणांना विशेष अतिथी म्हणून आमंत्रण

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या राष्ट्रीय युवा दिनानिमित्त दिल्लीत भारत मंडपम् इथं तीन हजार युवा नेत्यांशी संवाद साधणार आहेत. स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय युवा दिन साजरा केला जातो. विकसित भारतासाठी एक लाख तरुणांना राजकारणात सहभागी करून त्यांना राष्ट्रीय व्यासपीठ उपलब्ध करून देणं हा या संवादाचा उद्देश आहे. यावेळी तंत्रज्ञान, शाश्वतता, महिला सक्षमीकरण, उत्पादन आणि शेती यासारख्या विषयांवर दहा उत्कृष्ट निबंधांच्या पुस्तकाचं प्रकाशन प्रधानमंत्र्यांच्या हस्ते होणार आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज अयोध्येतल्या रामलल्ला अभिषेकाच्या पहिल्या वर्धापन दिनानिमित्त सर्व देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. विकसित भारताचा संकल्प पूर्ण करण्यासाठी हे दिव्य आणि भव्य राम मंदिर प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास प्रधानमंत्र्यांनी समाज माध्यमांवर व्यक्त केला. अयोध्येत रामलल्लाच्या प्राणप्रतिष्ठेला एक वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त आजपासून विशेष कार्यक्रम होत आहेत. गेल्या वर्षी २२ जानेवारी रोजी प्राणप्रतिष्ठा झाली होती, परंतु तिथीनुसार आजपासून हा उत्सव साजरा केला जाणार आहे.

**<><><><><>**

गेल्या वर्षभरात १६ हजार ९१४ कोटी रुपयांचे अंमली पदार्थ जप्त करण्यात पोलीस आणि अंमली पदार्थ प्रतिबंधक विभागाला यश मिळालं असून स्वातंत्र्यप्राप्तीनंतरची ही सर्वाधिक आकडेवारी आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी ही माहिती दिली. ते आज दिल्लीत अंमली पदार्थ तस्करी आणि राष्ट्रीय सुरक्षा या विषयावरच्या परिषदेत अध्यक्ष या नात्याने बोलत होते. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतल्या विकसित भारताचं निर्माण करायचं असेल तर नशामुक्त भारत झाल्याखेरीज ते शक्य नाही. यासाठी केंद्र आणि राज्यांनी एका व्यासपीठावर येऊन काम करायला हवं, असं आवाहन शहा यांनी यावेळी केलं. अंमली पदार्थ विल्हेवाट पंधरवडा मोहिमेचं तसंच मानस - दोन या हेल्पलाईन सेवेच्या सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशातल्या विस्ताराचं उद्घाटनही अमित शहा यांच्या हस्ते झालं.

**होल्ड बाईट....अमित शहा**

गेल्या दहा वर्षांत सुमारे २४ लाख किलो अंमली पदार्थ जप्त करण्यात आले आणि ५६ हजार ८०० कोटी रुपयांच्या अंमली पदार्थांची विल्हेवाट लावण्यात आली असल्याची माहितीही शहा यांनी दिली.

**<><><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा उद्या अहिल्यानगर जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार असून ते शनिशिंगणापूर आणि शिर्डीला भेट देणार आहेत. शिर्डीमध्ये होणाऱ्या भारतीय जनता पक्षाच्या राज्य अधिवेशनाला ते उपस्थित राहणार आहेत. या अधिवेशनाला मंगलप्रभात लोढा, संजय सावकारे, चंद्रकांत पाटील, यांच्यासह भाजपाचे इतर मंत्री उपस्थित राहणार आहेत.

**<><><><><>**

केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज पुण्यातल्या सी-डॅक अर्थात प्रगत संगणक विकास केंद्राच्या प्रांगणात आयोजित प्रदर्शनाला भेट दिली. यावेळी त्यांनी केंद्रातल्या शास्त्रज्ञ आणि अधिकाऱ्यांसोबत आढावा बैठक घेतली. प्रगत संगणक तंत्रज्ञान निर्माण करण्यासाठी  सी-डॅक आधीपासून काम करत असल्याचं त्यांनी वेळी सांगितलं. देशातल्या सर्व शाळा- महाविद्यालयांना आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध करून देण्यावर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी भर देत असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><><>**

एचडीएफसी बँकेचे माजी अध्यक्ष दीपक पारेख यांनी २०२५साठी भारताचा विकास दर ६ पूर्णांक ४ दशांश टक्के राहण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. हा दर जागतिक सरासरीच्या दुप्पट असल्याचंही त्यांनी म्हटलं आहे. इंडियन पीपल्स फोरम: बिझनेस अँड प्रोफेशनल कौन्सिल- संयुक्त अरब अमिरातीद्वारे आयोजित ‘इंडियाज रोडमॅप टू २०३०’ या विषयावर आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

आर्थिक वर्षाच्या उत्तरार्धात विकास दर ६ पूर्णांक ७ टक्क्यांवर जाण्याची अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. परवडणाऱ्या घरांसाठी प्रोत्साहन आणि पायाभूत सुविधांच्या विकासावर लक्ष देण्याची गरज असल्याचं मत त्यांनी व्यक्त केलं. यावेळी दुबईतले भारताचे महावाणिज्यदूत सतीश सिवन यांनी द्विपक्षीय व्यापार ८५ अब्ज यूएस डॉलर्सपर्यंत पोहोचला असल्याचं सांगितलं.

<><><><><>

राष्ट्रकुल देशांमधल्या संसदांचे सभापती आणि पीठासीन अधिकाऱ्यांची २८ वी परिषद पुढच्या वर्षी  भारतात होणार आहे. लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी आज समाज माध्यमांद्वारे ही घोषणा केली. २८ व्या CSPOC चा भर हा संसदेच्या कामकाजात कृत्रिम बुद्धीमत्ता आणि समाज माध्यमांचा वापर यावर असेल. या दरम्यान त्यांनी बेलीफ ऑफ ग्वेर्नसे, पीठासीन अधिकारी सर रिचर्ड मॅकमोहन यांचेही आभार मानले.

<><><><><>

मुंबई मेट्रो लाईन ७ आणि २ए या दोन्ही मार्गांवर पूर्ण गतीनं संचालनासाठी सीसीआरएस, अर्थात रेल्वे सुरक्षा मुख्य आयुक्तां कडून सुरक्षा प्रमाणपत्र आज प्रदान करण्यात आलं. त्यामुळे ५० ते ६० किमी प्रति तास या मर्यादित वेगाऐवजी आता ८० किमी प्रति तास या पूर्ण क्षमतेनं मेट्रोचं संचालन होईल. मेट्रो लाईन ७ आणि २ए साठी मिळालेली नियमित मंजुरी हे मुंबईला कार्यक्षम वाहतूक व्यवस्थेसह जागतिक दर्जाचं शहर बनवण्याच्या दिशेनं एक महत्त्वाचं पाऊल आहे, अशी प्रतिक्रीया मुख्यामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली.

<><><><><>

प्रजासत्ताक दिनाच्या संचलनासाठी मुंबईतल्या ५ आणि महाराष्ट्रातल्या एकूण २३ व्यक्तींना विशेष अतिथी म्हणून आमंत्रित करण्यात आलं आहे. यामध्ये मुंबईतल्या अतुल जाधव, वैभव पाटील, ब्रह्मदेव पंडित, अभय ब्रह्मदेव पंडित उज्ज्वला पाटील यांना आमंत्रित करण्यात आलं आहे. यावर्षी २६ जानेवारी रोजी नवी दिल्लीत कर्तव्य पथावर होणाऱ्या संचलनाला विविध क्षेत्रात सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या १० हजार व्यक्तींना विशेष अतिथी म्हणून आमंत्रित करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

१४ जानेवारी हा दिवस देशाच्या तिन्ही सशस्त्र दलांमधून निवृत्त झालेल्या जवानांचा दिवस म्हणून साजरा केला जातो. या निमित्ताने मुंबईत मरीन ड्राइव्ह इथं ५०० निवृत्त जवानांचं संचलन उद्या होणार आहे. यात शौर्यपदक विजेते जवानही सहभागी होतील. देशाच्या सेवेसाठी निवृत्त जवानांचं योगदान अधोरेखित करणं हा या संचलनाचा उद्देश आहे. १४ जानेवारी १९५३ रोजी स्वतंत्र भारताचे पहिले लष्करप्रमुख फील्ड मार्शल के. एम. करिअप्पा सेवानिवृत्त झाले होते. त्यांच्या स्मरणार्थ हा दिवस पाळला जातो.

**<><><><><>**

अकोला जिल्हाधिकारी कार्यालयात शासनाच्या विविध योजनांची तसंच प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी जिल्हा वॉर रूमची स्थापना करण्यात आली आहे. या कक्षाद्वारे शासनाच्या महत्त्वाच्या १४ योजनांचा नियमित आढावा घेण्यात येणार आहे. त्यानुसार समन्वयकांमार्फत नियमित आढावा सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी विभागप्रमुखांना दिले आहेत.

**<><><><><>**

खोखो विश्वचषक स्पर्धेची सुरुवात येत्या सोमवार पासून नवी दिल्ली इथल्या इंदिरा गांधी इनडोअर स्टेडीअम मध्ये होणार आहे. २० पुरुष आणि १९ महिला संघ या स्पर्धेत सहभागी होणार आहेत. आतापर्यंत १४ संघांचं आगमन झाल्याचं आयोजकांनी सांगितलं आहे. युरोप, दिक्षिण अफ्रिका, दक्षिण अमेरिकेमधले संघ या स्पर्धेत सहभागी होणार आहेत. स्पर्धेची पूर्ण तयारी झाल्याचंही आयोजकांनी सांगितलं. १९ जानेवारी पर्यंत या स्पर्धा चालणार आहेत.

**<><><><><>**

क्वालालंपूर इथं सुरु असलेल्या मलेशिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या, चिराग शेट्टी आणि सात्विक साईराज रंकीरेड्डी या जोडीनं पुरुष दुहेरीची उपांत्य फेरी गाठली आहे. काल झालेल्या सामन्यात भारतीय जोडीनं मलेशियाच्या जोडीचा २६-२४, २१-१५ असा पराभव केला. उपांत्य फेरीत चिराग आणि सात्विकची लढत कोरियन जोडीशी होईल.

**//<><><><><>//**